नवप्रभा

# 'लैंगिक अत्याचारांची तक्रार महिलांनी निर्भयपणे करावी'

**दोडामार्ग (न. प्र.)**

महिलांनी आपल्यावरील लैंगिक अत्याचारांची तक्रार निर्भयपणे पोलिसांत करावी, पोलीस नक्कीच अशा महिलांना न्याय देतील, असे दोडामार्ग पोलीस उपनिरीक्षक प्रकाश पवार यांनी सांगितले.

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात महिला विकास कक्षाचा शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी 'महिला विषयक कायदे व संरक्षण' या विषयावर विद्यार्थिनींशी त्यांनी संवाद साधला. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, समन्वयक प्रा. एस. एस. पाडगावकर, सचिव किरण नाईक, प्रा. आर. एस. इंगळे, महिला पोलीस अनुराधा देसाई आदि उपस्थित होते.

पवार पुढे म्हणाले की, समाजात महिलांवर लैंगिक छळाच्या घटना उग्र रूप धारण करीत आहेत. मात्र या छळाविरुद्ध जागृती नसल्याने महिला पोलीस स्थानकात जाणे टाळतात. परिणामी लैंगिक छळाचे प्रमाण वाढत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महिलांवरील अत्याचार कमी करण्यासाठी प्रत्येक पोलीस स्थानकात महिला तक्रार निवारण समिती स्थापन केली आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

प्राचार्य पाटील म्हणाले की, १९९२मधील भवरी देवी सामूहिक बलात्कार प्रकरणाची सुनावणी चालू असताना सुप्रीम कोर्टाने महाविद्यालये, सार्वजनिक संस्थांत महिला तक्रार निवारण समित्या स्थापन करण्याचे आदेश दिले होते. २००१मध्ये मुंबई विद्यापीठानेही अशी समिती स्थापन केली.

लक्ष्मीबाई हळबे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महिला विकास कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी महिलाविषयक कायदे, महिला तक्रार निवारण समिती आदी मजकूर असलेल्या फलकांचे अनावरणही महाविद्यालयात करण्यात आले. प्रास्ताविक विद्यार्थिनी ईशा बर्वे हिने केले. किरण नाईक यांनी आभार मानले.

## हळबे महाविद्यालयातर्फे स्वच्छता मोहीम

**दोडामार्ग (न. वा.)**

दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रामपंचायत दोडामार्ग यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील प्रमुख रस्त्यांवर स्वच्छता मोहीम मोठ्या उत्साहात राबविण्यात आली. दोडामार्ग येथील बाजारपेठ, भेडशी रोड, गोवा रोड, सावंतवाडी रोड व आई रोड या प्रमुख मार्गावर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. अभियानसाठी ग्रामपंचायत, शासकीय अधिकारी यांनी सहकार्य करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी स्वतः हाती झाडू घेऊन स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ केला. यावेळी सूर्यकांत परमेकर, विवेकानंद नाईक, आनंद तांबुळकर, प्रा. एस. यू. दरेकर, प्रा. रामकिसन मोरे, ग्रामपंचायत कर्मचारी आदी उपस्थित होते.